मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | बुधवार, दि. 12 जून 2024 | पान- 1

# 103 शिक्षक मानधन तत्त्वावर नेमणार

## गुणवत्तावाढीसाठी विविध प्रयत्न सुरुच ठेवणार : महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रम राबवले जात आहेत. शिक्षकांची कमतरता दूर करण्यासाठी मागील शैक्षणिक वर्षात पवित्र पोर्टलमार्फत १०६ माध्यमिक शिक्षकांची भरती झाली. येत्या काही दिवसांत १०३ माध्यमिक शिक्षकांची मानधन तत्त्वावर नियुक्ती केली जाणार आहे, असे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी स्पष्ट केले आहे.



तसेच, गुणवत्तावाढीसाठी २६ कला व ३२ क्रीडा शिक्षकांची नेमल्याचेही त्यांनी म्हटले. शिक्षण विभागाच्या वतीने मुख्याध्यापक, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समिती यांच्यासमवेत संवादसत्र चिंचवडमध्ये पार पडले. त्यावेळी ते बोलत होते. आयुक्त सिंह पुढे म्हणाले की, पालिकेच्या ५२ प्राथमिक शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर २६ कला शिक्षकांची नेमणूक केली आहे. या शिक्षकांची प्रशिक्षण कार्यशाळा १३ जून ते १४ जून रोजी घेण्यात येणार आहे. ३२ प्राथमिक शाळांमध्ये ३२ क्रीडा शिक्षकांची प्रायोगिक तत्त्वावर नेमणूक झाली. चालू शैक्षणिक वर्षामध्ये सर्व शाळांमध्ये स्टुडंट कौन्सिलची निवड केली जाईल. तर, जुलै २०२४ पासून मास्टर ट्रेनर हे प्रभागानुसार क्लस्टर मिटिंगचे आयोजन करतील. विद्यार्थ्यांना शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून क्यूआर कोड प्रदान करण्यात येणार आहे. डीबीटीद्वारे शालेय साहित्य खरेदी करण्यास कोणतीही अडचण आल्यास या अडचणींचे निरसन करण्यासाठी शिक्षकांसाठी हेल्पलाइन उपलब्ध करून दिली जाईल.

साहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात म्हणाले की, शालेय साहित्यासाठी पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी ३ हजार ७०० रुपये, तर पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी ३ हजार ९०० रुपये रक्कम निश्चित करण्यात आली आहे. शाळा व प्रशासन यांच्यामध्ये सुलभ समन्वय राखण्यासाठी एकूण ११ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. सध्या ९ प्रभारी पर्यवेक्षकांची सेवाज्येष्ठतेनुसार नियुक्ती प्रक्रिया सुरू आहे. माध्यमिक शाळा व प्रशासन यांच्यातील समन्वयासाठी एक पशिक्षणाधिकारी व २ समन्वयक नेमण्यात आले आहेत. तसेच, गतवर्षी ४० हजार विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी पूर्ण करण्यात आली होती. यावर्षी देखील आरोग्य तपासणी होईल, असेही थोरात म्हणाले.

### शिक्षकांना बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य

» महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये अत्याधुनिक थम्ब मशिन्स बसवण्यात येणार आहेत. जुलै महिन्यापासून सर्व शिक्षक व शिक्षिका कर्मचाऱ्यांचे पगार बायोमेट्रिक हजेरीप्रमाणे करण्याचे नियोजन आहे, असे विजयकुमार थोरात यांनी सांगितले. तसेच, शालेय गरजेनुसार शैक्षणिक प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यात यावेत. यासाठी प्रकल्प सल्लागार समिती स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांसाठी २५ समुपदेशकांची नेमणूक केली जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# मॉन्सूनकाळातील दुर्घटना रोखण्यास महापालिका सज्ज

## महापालिकेत चोवीस पथक तैनात : सर्व क्षेत्रीय कार्यालयात आपत्कालीन सेवा उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

मॉन्सून काळात रात्रीच्या वेळी शहरात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी महापालिकेच्या वतीने क्षेत्रीय कार्यालयनिहाय रात्रपाळीत आपत्ती व्यवस्थापन पथक तैनात करण्यात आले असून नागरिकांनी रात्री घडणाऱ्या दुर्घटनांबाबत संबंधित क्षेत्रीय कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाकडे संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे. तसेच मान्सून काळात कोणत्याही परिस्थितीला हाताळण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपले संपर्क क्रमांक २४ तास सुरू ठेवावावेत आणि घटनास्थळी तातडीने दाखल होऊन परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळावी, अशा सूचना देखील त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला असून यंदा सरासरी प्रमाणापेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे. त्याबाबतचा आढावा घेण्यासाठी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली



आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक पर पडली, त्यावेळी त्यांनी प्रशासनाला सूचना दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, उल्हास जगताप, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, स्मार्टसिटी सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीळकंठ पोमण, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, मुख्य अभियंता, रामदास तांबे, श्रीकांत सवणे, सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, संजय खाबडे, संजय कुलकर्णी, बाबासाहेब गलबले, प्रमोद ओंभासे, उप आयुक्त विठ्ठल जोशी, संदीप खोत, अण्णा बोदडे, रविकिरण घोडके, नीलेश भदाणे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे, अमित पंडित, डॉ. अंकुश जाधव, सीताराम बहुरे, यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

### आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार

» पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्या प्रवास करतात. या नद्यांच्या तिरावर मोठ्या संख्येने नागरिक वास्तव्यास आहेत. नद्यांच्या उगमाकडील भागात अतिवृष्टी झाल्यास शहरातील नदी तटावरील घरांमध्ये पाणी शिरण्याच्या शक्यता निर्माण होतात. तसेच जास्त पावसामुळे शहरात गटार, रस्ते, नाला अशा ठिकाणी पाणी तुंबणे, पाणी घरात शिरणे, घराची पडझड होणे, वादळ वाऱ्यामुळे झाडे पडणे अशा दुर्घटना घडू शकतात. या दुर्घटनांचा नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी क्षेत्रीय कार्यालय स्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून योग्य नियोजन

# मिळकतकराची पुन्हा थकबाकी..!

## अभय योजनेचा लाभ घेऊनही निम्म्या मिळकतदारांचा कर थकित : करआकारणी विभागाकडून विशेष वसुली मोहीम

**पुणे | प्रतिनिधी**

मिळकतकर थकवलेल्या नागरिकांसाठी पुणे महापालिकेने अभय योजना लागू केली होती. त्यानुसार थकबाकीदारांनी योजनेचा लाभ घेतला. मात्र ज्यांच्यासाठी ही योजना आणली त्याच मिळकतदारांपैकी निम्म्या मिळकतदारांनी पुन्हा कर थकबाकी ठेवली असल्याची धक्कादायक माहिती 'आरटीआय' मधून समोर आली आहे.

मिळकतकराची थकबाकी वसूल व्हावी म्हणून पुणे महापालिकेने २०२०-२१ मध्ये अभय योजना आणली होती. या योजनेचा १,४९,६८३ थकबाकीदार मिळकतकरधारकांनी फायदा घेत करभरणा केला. मात्र या प्रक्रियेत महापालिकेने दिलेल्या दंड आणि व्याजमाफीपोटी महापालिकेचे २१० कोटी रुपयांचे नुकसान झाले.



महापालिकेने लगेचच २०२१-२२ मध्ये पुन्हा एकदा मिळकतकराची थकबाकी वसूल व्हावी म्हणून अभय योजना आणली होती. या योजनेचा ६६,४५४ थकबाकीदार मिळकतकरधारकांनी फायदा घेतला आणि कर भरला.या प्रक्रियेत महापालिकेने दिलेल्या दंड व व्याजमाफी पोटी महापालिकेचे ६४ कोटी रुपयांचे नुकसान झाले. ज्या वेळी अभय योजना राबविण्यात आली, त्यावेळी प्रामाणिकपणे कर भरणाऱ्यांवर हा अन्याय असल्याचे महापालिकेला सांगण्यात आले होते, असे सजग नागरिक मंचचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी सांगितले. वेलणकर यांनीच याबाबत माहिती अधिकारात विचारणा केली होती. त्याच्या उत्तरात मिळालेल्या माहितीतून अभय योजनेचा लाभ घेतलेल्या मिळकतदारांनी पुन्हा कर थकबाकी ठेवली असल्याचे समोर आले आहे.

यासंदर्भात बोलताना विवेक वेलणकर म्हणाले, "या योजनेमुळे दरवर्षी प्रामाणिकपणे वेळेवर कर भरणाऱ्या नागरिकांवर विपरित परिणाम होऊ शकतो, अशी भीती आमच्यासह अनेकांनी व्यक्त केली होती. थकबाकीदार सोकावतील आणि नवीन अभय योजना येईपर्यंत कर भरणार नाहीत, असेही सांगण्यात आले होते. दुर्दैवाने आमची भीती खरी ठरली. महापालिकेच्या मालमत्ता करविभागाकडे माहिती अधिकारात विचारले होते की, या अभय योजनेचा फायदा घेतलेल्यांपैकी किती मालमत्ताधारक ३१ मार्च २०२४ रोजी पुन्हा थकबाकीदार झाले आहेत? त्यांनी किती कर भरलेला आहे? यावर महापालिकेने दिलेली माहिती अत्यंत धक्कादायक आहे. २०२०-२१ मध्ये ज्या १,४९,६८३ थकबाकीदार मालमत्ताधारकांनी अभय योजनेचा फायदा घेतला त्यापैकी ५६,९०४ मालमत्ताधारक मार्च २०२४ अखेर पुन्हा थकबाकीदार झाले. तर २०२१-२२ मध्ये ज्या ६६,४५४ थकबाकीदार मालमत्ताधारकांनी अभय योजनेचा फायदा घेतला, त्यापैकी ४१,५०० मालमत्ताधारक मार्च २०२४ अखेर पुन्हा थकबाकीदार झाले आहेत."

> माहिती अधिकारातून जी माहिती समोर आली आहे, ती माहिती महापालिका आयुक्तांना देण्यात येणार आहे. अभय योजनेचा लाभ घेऊन पुन्हा थकबाकी ठेवणाऱ्या मिळकतदारांवर काय कारवाई करायची, याचा निर्णय आयुक्त घेतील. आता अशा थकबाकीदारांनी स्वतंत्र यादी काढली जाईल. त्यांच्यासाठी विशेष वसुली मोहीम राबविली जाईल. महापालिकेकडून आता पुन्हा अभय योजना राबविण्याचा विचार नाही.
>
> **- माधव जगताप, मिळकर करआकारणी विभागप्रमुख, पुणे महापालिका**

# 'पाटबंधारे' च्या जागेत अनधिकृत होर्डिंगचा सुळसुळाट!

## आकाशचिन्ह विभागाचा आशीर्वाद असल्याने सहा वर्षांपूर्वी तक्रार करूनही कारवाई शून्य

**पुणे | प्रतिनिधी**

घाटकोपरमधील जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेसारखी पुनरावृत्ती शहरात होऊ नये यासाठी पालिका हद्दीतील नियमबाह्य जाहिरात फलक हटविण्याचे निर्देश पालिका प्रशासनाने दिले असले तरी हा केवळ दिखावा आहे. खडकवासला पाटबंधारे विभागाने गेल्या सहा वर्षांपासून त्यांच्या जागेतील अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्याची मागणी महानगरपालिकेकडे वारंवार केली आहे. असे असूनही आजतागायत कोणत्याही होर्डिंगवर कारवाई करण्यात आली नसल्याची धक्कादायक माहिती नव्याने केलेल्या माहिती अधिकारात केलेल्या अर्जाच्या उत्तरात उघड झाली आहे. त्यामुळे पालिकेने पंधरा दिवसांच्या आत अनधिकृत होर्डिंगवर कारवाई केली नाही तर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रसिद्धी प्रमुख अनंत घरत यांनी दिला आहे.



अनंत घरत म्हणतात की, मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये जाहिरातीसाठी मोठ-मोठे होर्डिंग उभारले जातात. एखादी जीवघेणी दुर्घटना घडल्यावर ते अनधिकृत असल्याचे स्पष्ट होते. कायद्याचे पालन केले नाही म्हणून कारवाई होते. असे असताना ६ वर्षांहून जास्त काळ होऊनही आकाशचिन्ह विभाग कुंभकर्णासारखा झोपल्याचे दिसते. खडकवासला पाटबंधारे विभागाने १८ सप्टेंबर २०१८ ला पुणे मनपा आयुक्तांना पत्र देऊन अनधिकृत होर्डिंगधारकांची नावे पाठवली होती. तसेच त्यांचा परवाना नूतनीकरण करू नये असे कळविले असतानाही आकाशचिन्ह विभागाने आजतागायत अनधिकृत होर्डिंगवर कारवाई केली नसल्याचे माहिती अधिकारात उघड झाले आहे.

माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार खडकवासला पाटबंधारे विभागाची कॅनॉल आणि परिसरातील जागा ही महानगरपालिका हद्दीतील खडकवासला ते लोणीकाळभोरपर्यंत आहे. पालिकेची विविध क्षेत्रीय कार्यालये या हद्दीत आहेत. त्यामुळे अनधिकृत होर्डिंगवरील कारवाईबाबत माहिती विचारली असता उडवाउडवीची उत्तरे साहाय्यक आयुक्त आणि आकाशचिन्ह विभागातील अधिकारी देतात. हा केवळ वेळकाढूपणा असून अनधिकृत होर्डिंगला अभय देण्याचे यांचे धोरण आहे. सद्यस्थितीत पाटबंधारेच्या जागेतील अनधिकृत होर्डिंगसंदर्भात कोर्टातील केसवरील स्थगिती उठली असून कारवाईचा मार्ग मोकळा झाला असतानाही कोणाच्या आदेशाची आणि किंवा निष्पापांच्या मृत्यूची वाट प्रशासन पाहात आहे, असा संतप्त सवाल घरत यांनी केला आहे.

> पालिकेकडून अनधिकृत होर्डिंगवर कारवाई केली जात आहे. खडकवासला पाटबंधारे विभागाच्या जागेत उभारण्यात आलेले होर्डिंग अनधिकृत आहेत किंवा कसे याबाबत माहिती घेतली जाईल. २०१८ साली दिलेल्या पत्राबाबत माहिती घेतली जाईल. अनधिकृत होर्डिंग आहेत का, याची खात्री करून पालिकेकडून कारवाई केली जाईल. याबाबत योग्य माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.
>
> **- माधव जगताप, आकाशचिन्ह विभाग प्रमुख.**

# महापालिका आयुक्त शेखर सिंह 18 दिवसांच्या सुट्टीवर

## 11 जून ते 28 जून या कालावधीत सुट्टीवर : राहुल महिवाल यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह हे तब्बल १८ दिवसांच्या सुट्टीवर गेले आहेत. दि.११ जून ते २८ जून या कालावधीत त्यांनी अर्जित रजा घेतली आहे. त्यांच्या उपरोक्त कालावधीत श्री. राहुल महिवाल, भाप्रसे, महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. या संदर्भातील आदेश महाराष्ट्र राज्याचे कार्यासन अधिकारी शिवाजी बा. चव्हाण यांनी दिले आहेत.



महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दि.११ ते दि.२८ जूनपर्यंत रजा मागितली होती. त्यांच्या या अर्जित रजेस सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिलेली आहे. शेखर सिंह यांच्या उपरोक्त रजा कालावधीचा आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. राहुल महिवाल, भाप्रसे, महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. श्री. राहुल महिवाल, भाप्रसे, महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांनी स्वतःकडील कार्यभार सांभाळून आयुक्त पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे या पदाचे कर्तव्य पार पडणार आहेत. शेखर सिंह हे रजेवरून परत आल्यावर राहुल महिवाल यांच्याकडील अतिरिक्त कार्यभार आपोआप संपुष्टात येणार आहे.

महापालिकेतील नगरसेवकांचा पाच वर्षाचा कार्यकाळ १३ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आला आहे. त्यापूर्वीच निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक होते. परंतु, कोरोना, ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणामुळे महापालिका निवडणूक वेळेत झाली नाही. तेव्हापासून प्रशासक महापालिकेचा कारभार पाहत आहेत. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे शहराचा विकास मोठ्या प्रमाणावर खुंटला आहे. अशातच नुकतीच लोकसभा निवडणुक देखील पार पडली, याकालावधीत सुरू असलेल्या आचारसंहितेचा फटका देखील कामांना बसला आहे. आता पावसाळ्यात आयुक्त तब्बल १८ दिवस सुट्टीवर गेल्यामुळे आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्याला जबाबदार कोण? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

# शहरातील 'पे अ‍ॅण्ड पार्क' योजना महापालिकेने अखेर 'गुंडाळली'

## बनावट कागदपत्रांसह बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या 5 बांगलादेशी नागरिकांना अटक




**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेने पिंपरी-चिंचवड शहरातील वाहन चालकांसाठी सशुल्क वाहन पार्किंग (पे अ‍ॅण्ड पार्क) योजना मोठा गाजावाजा करत सुरू केली होती. मात्र वाहन चालकांसह वाहतूक पोलिसांनी प्रतिसाद न दिल्याने ही योजना अखेर, महापालिकेने गुंडाळली आहे. त्यामुळे शहरात वाहन पार्क करण्यासाठी कोणी पैसे देऊ नये असे निवेदन महापालिकेचे सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे यांनी केले आहे.

शहरात तसेच, शहरालगत असलेल्या नागरी भागातील वाढत्या नागरीकरणामुळे वाहतूक वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शहरातील ठिकठिकाणी रस्त्यावर अनधिकृतपणे तसेच, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे वाहने उभी केली जात होती. यामुळे शहरातील नागरिकांना वाहतुक कोंडीच्या समस्येस तोंड द्यावे लागत होते. शहरातील नागरिकांसाठी वाहतूक सुरळीत होणे व पार्किंगची सुविधा उपलब्ध होणे या हेतूने वाहतूक पोलिस आणि महापालिकेने पे अ‍ॅण्ड पार्क योजना शहरातील विविध भागांत सुरू केली होती. त्याचे उद्घाटन तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी केले होते.

रस्त्यांवर वाहन पार्क केलेल्यांकडून शुल्क वसूल करण्यासाठी महापालिकेने ७ एप्रिल २०२१ ला निर्मला ऑटोकेअर या एजन्सीची नेमणूक केली होती. वाहन चालकांनी तसेच, वाहतूक पोलिसांनी या योजनेला पाहिजे तसा प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे काही महिन्यांतच ही योजना अनेक ठिकाणी बंद करण्याची नामुष्की महापालिकेवर ओढावली. रडतखडत काही भागात ही योजना सुरू होती. अखेर, ६ एप्रिल २०२४ ला ठेकेदाराची मुदत संपुष्टात आल्याने ही योजना बंद करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे शहरात कोठेही वाहनांसाठी रक्कम वसूल करता येणार नाही, असे सहशहर अभियंता ओंभासे यांनी सांगितले.

# बालवाडी शिक्षिका व सेविकांच्या मानधनात वाढ

## स्थायी समितीच्या बैठकीत एकमताने घेतला निर्णय : दहा टक्के वाढ करण्यास मान्यता



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या बालवाडी शिक्षिका व बालवाडी सेविका यांच्या मानधनात १० टक्के वाढ करण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतला. त्या प्रस्तावास शनिवारी (८ जून) त्यांनी स्थायी समितीची मान्यता दिली. बालवाडी शिक्षिका व सेविकांच्या मानधन वाढीसह महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना प्रशासक सिंह यांनी मंजुरी दिली.

यामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी लेखा विभागामध्ये २ सेवानिवृत्त कर्मचारी मानधनावर नियुक्ती करण्यात आली.

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या सेंट्रल गॅस प्लँटच्या निखळलेल्या पाईपलाईन दुरुस्ती, वैद्यकीय विभागाकडील नवीन ४ रुग्णालय व वायसीएममधील नवजात शिशू विभागाकरीता निओनेटल व्हेंटिलेटर खरेदी करणे, शहरात ठिकठिकाणी बोअरवेल घेणे, जुन्या बोअरवेलची देखभाल दुरुस्ती करणे, स्थापत्य विषयक कामे करणे, ठिकठिकाणी सुशोभिकरण करणे, आवश्यक ठिकाणी पाणीपुरवठा करणे, नवीन कूपनलिका करणे, पाईपलाईन टाकणे, पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करणे, ठिकठिकाणी वॉल्व बसवणे, जलवाहिन्या टाकण्याकरिता खोदण्यात आलेल्या ट्रेंचेसचे डांबरीकरण करणे आदी कामांसाठी मान्यता देण्यात आली.

दरम्यान, लोकसभेची आचारसंहिता संपल्यानंतर आयुक्त सिंह यांनी शासकीय सुट्टीच्या दिवशी बैठका घेऊन निर्णय घेतले आहे. स्थायी समितीच्या बैठकीत त्यांनी अनेक खर्चाचे प्रस्ताव देखील या बैठकीत मंजूर केले.

# सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवा

## राज्यसभेवर पाठवून केंद्रीय मंत्रीपद द्यावं : अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत बारामती लोकसभा मतदारसंघाकडे सर्वांचंच लक्ष्य लागलं होते. या मतदारसंघात सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होती. मात्र, याठिकाणी खरी लढत ही शरद पवार विरुद्ध अजित पवार यांच्यातच असल्याचं बोललं जात होतं, या लढाईत सुप्रिया सुळे यांनी सुनेत्रा पवार यांचा एका लाखापेक्षा जास्त मतांनी पराभव केला. दरम्यान, या पराभवानंतर आता सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवा, अशी मागणी पुढे आली आहे.





पुण्यातील काटेवाडीतील काही ग्रामस्थ आणि अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांची सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवा, अशी मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी अजित पवार यांना पत्रदेखील लिहिलं आहे. टीव्ही ९ वृत्तवाहिनीने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

यासंदर्भात बोलताना, काटेवाडीचे उपसरपंच मिलींद काटे म्हणाले, सुनेत्रा पवार यांना राज्यसभेवर पाठवून त्यांना केंद्रीय मंत्री मिळावं, असा ठराव आम्ही पारीत केला आहे. अशी सर्व ग्रामस्थांची इच्छा आहे. यासंदर्भात आम्ही अजित पवार यांना पत्र लिहिलं आहे. तसेच यासाठी सह्यांची मोहीम देखील सुरु करण्यात आली आहे.

याशिवाय अन्य एक ग्रामस्थ वंदना काटे यांनीही यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. सुनेत्रा पवार यांनी निर्मल ग्राम आणि स्वच्छतेविषयी तसेच पर्यावरणाच्या क्षेत्रात मोठं काम केलं आहे. त्यामुळे त्यांना राज्यसभेवर पाठवून केंद्रीय मंत्रीपद द्यावं, अशी मागणी आमच्या गावातील सर्व महिलांनी केली आहे, असे त्या म्हणाल्या.

### सुप्रिया सुळेंनी केला होता सुनेत्रा पवारांचा पराभव

» दरम्यान, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत संपूर्ण देशाचं लक्ष लागलेल्या बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनी अजित पवार गटाच्या उमेदवार सुनेत्रा पवारांचा पराभव केला होता. सुप्रिया सुळे यांना ७.३२ लाख मतं मिळाली होती. तर सुनेत्रा पवार यांना ५.७३ हजार मतं मिळाली होती. सुप्रिया सुळे यांनी १.५९ लाख मतांनी विजय मिळवला होता.

राष्ट्रवादीने आपले राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांना कॅबिनेट मंत्री करण्याची मागणी केली होती. रविवारी नरेंद्र मोदी सरकारमध्ये त्यांना स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्री करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता, मात्र राष्ट्रवादीने हा प्रस्ताव नाकारत कॅबिनेट मंत्रिपदाचा पुनरुच्चार केला.

गेल्या वर्षी जुलैमध्ये अजित पवार आठ आमदारांसह एकनाथ शिंदे सरकारमध्ये सामील झाले होते, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटला होता. कायदेशीर लढाईनंतर अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला पक्षाचे नाव आणि चिन्ह वाटप करण्यात आले. यानंतर शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी) हा नवा पक्ष स्थापन केला. विरोधी पक्ष नेते शरद पवार यांनी स्थापन केलेल्या NCP (SP) ने सोमवारी २५ वा वर्धापन दिन साजरा केला.

# अगरवाल दाम्पत्यासह तिघांच्या पोलीस कोठडीत वाढ!

## पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपली : न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांच्या न्यायालयात हजर

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणात मोटारचालक अल्पवयीन मुलाचे रक्ताचे नमुने नष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणात न्यायालयाने अगरवाल दाम्पत्यासह अश्फाक मकानदारच्या पोलीस कोठडीत चार दिवस वाढ करण्याचे आदेश सोमवारी दिले.अटक करण्यात आलेला आरोपी मकानदारने मुलाचे बांधकाम व्यावसायिक वडील विशाल अगरवाल यांना कोणाच्या सांगण्यावरून मदत केली आहे, याचा शोध घ्यायचा असल्याने विशाल अगरवाल, त्याची पत्नी शिवानी आणि अश्फाक यांच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती सरकार पक्षाने न्यायालयात केली.



अगरवाल दाम्पत्यासह अश्फाकच्या पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपली. तिघांना न्यायाधीश यू. एम. मुधोळकर यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. ससूनमधील शिपाई अतुल घटकांबळे याच्यामार्फत अश्फाकने डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर यांना पैसे पोहोचविले. अश्फाकने कोणाच्या सांगण्यावरून पैसे पोहोचविले, या दृष्टीने तपास करायचा असल्याची माहिती गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांनी न्यायालयात दिली. अश्फाक गुन्हा दाखल झाल्यानंतर पसार झाला होता. त्याला कोणी मदत केली, तसेच आरोपी डॉ. अजय तावरेच्या संपर्कात तो कसा आला, या दृष्टीने सखोल तपास करायचा असल्याने आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती गोवेकर यांनी न्यायालयाकडे केली.

या गुन्ह्याच्या तपासात प्रगती झाली आहे. आरोपी घटकांबळेने वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. बाल न्याय मंडळाच्या आवरात घटकांबळेने अगरवाल यांच्याकडून रोकड घेतली होती. डॉ. श्रीहरी हाळनोर याच्या हस्ताक्षराचा नमुना जप्त करण्यात आला आहे. ससून रुग्णालयाच्या वॉर्ड क्रमांक ४० मधील नोंदणी पुस्तिका (रजिस्टर) जप्त करण्यात आली आहे. साक्षीदारांकडे केलेल्या चौकशीत विशाल अगरवाल, अश्फाक मकानदार, डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर संपर्कात आल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्याची विनंती सरकारी वकील अनिल कुंभार यांनी युक्तिवादात केली. अगरवाल दाम्पत्याच्या वतीने ॲड. प्रशांत पाटील आणि आरोपी अश्फाकच्या वतीने ॲड. आर. एल. धापटे यांनी बाजू मांडली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून आरोपींच्या पोलीस कोठडीत १४ जूनपर्यंत वाढ करण्याचे आदेश दिले.